# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी





ट्रायकोग्रामा

यजमान किडी : पतंगवर्गीय किडीची अंडी

• कृषि माहिती वाहिनी : (02452) 229000 ई-मेल : deevnmkv@gmail.com • फोन : (02452) 228601
• विद्यापीठ संकेत स्थळ : www.vnmkv.ac.in विद्यापिठाच्या बातम्यांसाठी पहा www.promkvparbhani.blogspot.com /vnmkv /vnmkv /user/vnmkv

## ८ ऑगस्ट २०२३

अ.श्रावण/नि.श्रावण शके १९४५

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | | अधिक श्रावण कृ. ५/६<br>**६** | अधिक श्रावण कृ. १२<br>प्रदोष<br>अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी (तारखेप्रमाणे)<br>**१३** | निज श्रावण शु. ४ शुभ दिवस<br>विनायक चतुर्थी (स.११.२२ प.)<br>**२०** | निज श्रावण शु. ११<br>पुत्रदा एकादशी<br>**२७** |
| सो सोमवार | | अधिक श्रावण कृ. ७ शुभ दिवस<br>(सायं. ४.४१ न.)<br>**७** | अधिक श्रावण कृ. १३<br>शिवरात्री<br>**१४** | निज श्रावण शु. ५ शुभ दिवस<br>**नागपंचमी**<br>श्रावणी सोमवार शिवपुजन<br>शिवमुठ : तांदुळ<br>**२१** | निज श्रावण शु. १२ शुभ दिवस<br>सोमप्रदोष<br>श्रावणी सोमवार शिवपुजन<br>शिवमुठ : तीळ<br>**२८** |
| मं मंगळवार | अधिक श्रावण पौर्णिमा शुभ दिवस<br>**लोकमान्य बाळ गंगाधर** (दु.१.५८ नं.)<br>**टिळक पुण्यतिथी**<br>**अण्णाभाऊ साठे जयंती**<br>पौर्णिमा समाप्ती उ.रात्रौ ००.०१<br>**१** | अधिक श्रावण कृ. ८<br>कालाष्टमी<br>**८** | अधिक श्रावण कृ. १४<br>दर्श अमावास्या<br>**स्वातंत्र्य दिन, पतेती**<br>अमावास्या प्रारंभ दुपारी १२.४२<br>**१५** | निज श्रावण शु. ६ शुभ दिवस<br>मंगलागौरी पुजन<br>**२२** | निज श्रावण शु. १३ शुभ दिवस<br>**२९** |
| बु बुधवार | अधिक श्रावण कृ. १ शुभ दिवस<br>**२** | अधिक श्रावण कृ. ९<br>जागतिक अदिवासी दिन<br>**९** | **अधिक श्रावण अमावास्या**<br>पारशी फरवर्दिन मासारंभ<br>पारशी नुतनवर्ष सन १३९३ प्रारंभ<br>अमावास्या समाप्ती दुपारी ०३.०७<br>**१६** | निज श्रावण शु. ७ शुभ दिवस<br>(स.८.०७ प.)<br>**२३** | निज श्रावण शु. १४ शुभ दिवस<br>**नारळी पौर्णिमा** (स.१०.५९ प.)<br>**रक्षाबंधन**<br>पौर्णिमा प्रारंभ सकाळी १०.५८<br>**३०** |
| गु गुरूवार | अधिक श्रावण कृ. २ शुभ दिवस<br>**३** | अधिक श्रावण कृ. १० शुभ दिवस<br>(सायं. ४.३४ प.)<br>**१०** | निज श्रावण शु. १<br>**१७** | निज श्रावण शु. ८ शुभ दिवस<br>दुर्गाष्टमी (दु.३.२६ ते रात्रौ ८.३५)<br>**२४** | **निज श्रावण पौर्णिमा/**<br>निज श्रावण कृ. १<br>पौर्णिमा समाप्ती सकाळी ०७.०५<br>**३१** |
| शु शुक्रवार | अधिक श्रावण कृ. ३<br>**संकष्ट चतुर्थी** चंद्रोदय ०९.०७<br>**४** | अधिक श्रावण कृ. ११<br>**११** | निज श्रावण शु. २<br>**१८** | निज श्रावण शु. ९<br>**२५** | |
| श शनिवार | अधिक श्रावण कृ. ४ शुभ दिवस<br>**५** | अधिक श्रावण कृ. ११<br>कमला एकादशी<br>**१२** | निज श्रावण शु. ३ शुभ दिवस<br>**१९** | निज श्रावण शु. १०<br>**२६** | |

### या महिन्यातील करावयाची कामे

- बागायती पेरसाळीस पेरणीनंतर ६० दिवसांनी २० किलो नत्र युरियाद्वारे द्यावे.
- खरीप– जिरायती पिकाची निंदणी व कोळपणी करुन तणाचे नियंत्रण करावे व वरखताचा हप्ता द्यावा. पावसाचा ताण पडल्यास आरक्षित पाणी द्यावे.
- बागायती जिरायती (कोरडवाहू) कापसावरील किडीच्या नियंत्रणासाठी एकात्मिक कीड नियंत्रण पध्दतीचा अवलंब करावा.
- पावसाचे प्रमाण जास्त झाल्यास ठराविक अंतरावर चर खोदून साचलेले पाणी शेताबाहेर काढावे.
- कोबीवर्गीय भाज्याच्या लागवडीसाठी गादी वाफ्यावर पेरणी करावी.
- मिरचीच्या व कांद्याच्या रोपांची पुनर्लागवड करावी.
- जुलैमध्ये लावलेल्या भाजीपाल्यास नत्राचा दुसरा हप्ता द्यावा.
- जूनमध्ये हिरवळीच्या खताकरीता पेरलेल्या तागाचे पीक जमिनीत गाडावे.
- बाजरीची अरगट रोगग्रस्त कणसे आढळताच ती कापून नष्ट करावीत.
- पावसामध्ये खंड पडल्यास ज्वारी पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून येताच कीड नियंत्रणासाठी प्रभावी उपाय योजावेत.

धरती जनसेवा प्रतिष्ठाण, औरंगाबाद संचलित
कृषि महाविद्यालय, पाथरी
ता.पाथरी जि.परभणी
मान्यताप्राप्त : वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
स्थापना : 2010
कॉलेज कोड 11267
* प्रवेश क्षमता 120
* महाविद्यालयाची प्रशस्त व सुसज्ज ईमारत
* अनुभवी व तज्ञ प्राध्यापक वृंद
* प्रत्येक विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष
* सुसज्ज प्रयोगशाळा
* सुसज्ज ग्रंथालय
* प्रशस्त व अद्यावत संगणक कक्ष
* कॅम्पस मुलाखत
* प्लेसमेंट सेल
* शेडनेट, पॉलिहाऊस रोपवाटीका, आळंबी उत्पादन, गांडुळखत, कुक्कुटपालन, कायमस्वरूपी उत्पादन व प्रात्याक्षीक
डॉ.प्रमोद उत्तमराव शिंदे * अध्यक्ष * coapathri@gmail.com
डॉ.एस.बी.जैस्वाल प्राचार्य मो. : 9623571036
श्री.आर.बी.पाटील स्थानिक व्यवस्थापक मो. : 9404732939



महत्त्वाच्या नोंदी

# रासयनिक कीटकनाशक हाताळतांना ध्यावयाची काळजी

ऑगस्ट २०२३

डॉ.संजीव बंटेवाड
विभाग प्रमुख
मो. : ७९७२४२३८१२

डॉ.मिलिंद सोनकांबळे
सहाय्यक प्राध्यापक
मो. ९४२३४३८०३१

डॉ.राजरतन खंदारे
संशोधन सहयोगी
मो. : ८२७५६०३००९

कृषि कीटकशास्त्र विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

रासायनिक कीटकनाशकांचा महत्वाचा वाटा हा एकात्मिक कीड व्यवस्थापनात किडींची संख्या आर्थिक नुकसान पातळीच्या खाली ठेवण्यासाठी आहे. शेतकरीवर्ग किड नियंत्रणासाठी मोठया प्रमाणात कीटकनाशकांचा वापर करतो. या मध्ये बरेचसे कीटकनाशके हे अतिशय विषारी असतात. कीटकनाशके विषारी असल्याने हाताळणी व फवारणी करताना खबरदारी घेणे अतिशय गरजेचे आहे. त्या करीता खालील बाबींवर विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

**कीटकनाशकाची निवड :**

- किडींच्या नुकसानीचा प्रकार, प्रादुर्भावाची तीव्रता, आर्थिक नुकसानीची पातळी, अवस्था आणि किडीच्या तोंडाची रचना कशी आहेत, यावरून कीटकनाशकाची निवड करावी.
- सर्वसाधारणपणे पाने, फुले, फळे खाणाऱ्या अळयांच्या व्यवस्थापनाकरिता उदर विष (Stomach Poison) तसेच रस शोषक किडीच्या व्यवस्थापनाकरिता आंतरप्रवाही (Systemic Poison) आणि जमिनीत वास्तव्य करणाऱ्या किडीच्या व्यवस्थापना करिता धुरीजन्य (Fumigant Poison) किंवा जमिनीतुन द्यावे लागणाऱ्या कीटकनाशकांची निवड करणे अधिक प्रभावी ठरते.
- फवारणीसाठी सर्वप्रथम मवाळ कीटकनाशकांची म्हणजेच ज्या कीटकनाशकांच्या डब्यावर हिरवा त्रिकोण आहे, अशाच कीटकनाशकांची निवड करावी. त्यानंतर गरज भासल्यास मध्यम विषारी (नीळा त्रिकोण) किंवा शेवटी जहाल (पिवळा किंवा लाल त्रिकोण असलेले) कीडनाशके वापरावीत.
- एकाच गटातील कीटकनाशके वारंवार फवारणी न करता आवश्यक तेव्हा वरील उल्लेखीत बाबींचा विचार करून कीटकनाशकांची फेरपालट करून केंद्रीय कीटकनाशक मंडळाने शिफारशीत केलेली (लेबल क्लेम) कीटकनाशकांची फवारणी करावी.

**कीटकनाशकांची विषकारकता :**

- केंद्रीय कीटकनाशक बोर्डच्या मधील शिफारशीनुसार कीटकनाशकाचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.
- कीटकनाशकांचे विषकारकेतेनुसार अतितीव्र विषारी, फार विषारी, मध्यम विषारी, किंचित किंवा संभवतः हानिकारक असे वर्गीकरण आहे.
- अतितीव्र विषारी कीटकनाशकांच्या आवेष्टनावर (डब्यावर) पतंगीच्या आकारात लाल त्रिकोण व त्रिकोणाच्या वरच्या बाजूस धोक्याचे चिन्ह व लाल अक्षरात झेढीप (विष) असे दर्शविले असून ही कीटकनाशके अति जहाल गटात मोडतात.
- फार विषारी कीटकनाशकांच्या आवेष्टनावर पतंगीच्या आकारात पिवळा त्रिकोण व त्रिकोणाच्या वरच्या बाजूस अक्षरात Poison (विष) असे दर्शविले असून ही कीटकनाशके फार विषारी गटात मोडतात.
- मध्यम विषारी कीटकनाशकांच्या आवेष्टनावर पतंगीच्या आकारात निळा त्रिकोण व त्रिकोणाच्या वरच्या बाजूस अक्षरात Danger (धोका) असे दर्शविले असून ही कीटकनाशके मध्यम विषारी गटात मोडतात.
- किंचित किंवा संभवतः हानिकारक कीटकनाशकांच्या आवेष्टनावर पतंगीच्या आकारात हिरवा त्रिकोण व त्रिकोणाच्या वरच्या बाजूस अक्षरात Caution (दक्षता) असे दर्शविलेले असून सदर कीडनाशके मवाळ गटात मोडतात.

**कीटकनाशके खरेदी करतानाची काळजी :**

- कीटकनाशके परवनाधारक विक्रेत्या कडूनच खरेदी करावीत. खरेदी केलेल्या कीडनाशकाचे विक्रेत्याकडून पक्के बिल घ्यावे.
- लेबलक्लेम आणि शिफारस असलेले कीटकनाशक फवारणीसाठी आवश्यक तेवढयाच प्रमाणात खरेदी करावे.
- कीटकनाशके खरेदी करताना माहिती (लिफलेट) पत्रकाची मागणी विक्रेत्याकडेच करून ते माहिती पत्रक वाचून/ ऐकून घेऊन पूर्ण सूचनांचे पालन करावे व नंतरच खरेदी करावे.
- कालबाह्य झालेल्या किंवा आवेष्टन खराब झालेल्या कीटकनाशकांची खरेदी करू नये.

**हाताळताना व फवारताना घ्यावयाची काळजी :**

- कीटकनाशके शेतात फवारणी करते वेळी प्रथमोपचार साहित्य सोबत ठेवावे.
- खाद्य पदार्थ, इतर औषधांची कीडनाशकांचा संपर्क येऊ देऊ नये. तसेच कीटकनाशके लहान मुलांच्या संपर्कात येणार नाही, अशा गुपित ठिकाणी कुलूपबंद ठेवावीत.
- पीक, कीड व रोग निहाय कीटकनाशकांची निवड करून शिफारशी प्रमाणात फवारणीसाठी वापरावी.
- कीटकनाशक वापरण्यापुर्वी लेबल व माहितीपत्रक व्यवस्थित वाचून खबरदारीच्या सर्व सूचनांचे पालन करावे. तसेच कीटकनाशकांच्या डब्यावरील पतंगीच्या आकाराचे चिन्हे लक्षात घेऊन कीटकनाशक निवडून शिफरशीनुसार वापर करावा. जर त्यांचा अर्थबोध होत नसेल तर जानकारा कडून समजुन घ्यावे.
- तणनाशके फवारणीचा पंप चुकूनही कीटकनाशके फवारणीसाठी वापरू नये. गळक्या फवारणी पंपाचा वापर फवारणीसाठी करू नये.
  कीटकनाशक हाताळताना नेहमी हातात हातमोजे घालावेत. कीटकनाशके द्रावण हाताने न ढवळता काडीच्या सहाय्याने हातात हातमोजे घालुनच ढवळावे.
- कीटकनाशके हाताळताना व फवारणी करताना अंगरक्षक कपडे, हातमोजे, चष्मा, मास्क, टोपी, गनबुट इ. चा वापर करावा व संपूर्ण शरीर झाकले जाईल याची काळजी घ्यावी. दिवसाचे सर्वात उष्ण वेळी फवारणी करणे टाळावी.
- फवारणीसाठी तयार केलेले द्रावन फवारणी पंपात भरताना नेहमी नरसाळे वापरुन भरावे.
- प्रकुर्ती ठीक नसल्यास कीटकनाशके हाताळु नये किंवा फवारणी करने टाळावे.
- किटकनाशके अंगावर पडू नयेत म्हणून वाऱ्याच्या विरुध्द दिशेने फवारणी करु नये.
- फवारणीचे काम सुरू असताना खाणे-पिणे, तंबाखूचे सेवन धूम्रपान अगर मद्यपान करू नये.
- फवारणी स्थळा जवळ खाद्य पदार्थ ठेऊ नये.
- कीटकनाशके फवारणीसाठी हाता पायावर जखम असलेल्या व्यक्तीची निवड करू नये. फवारणी एकाच व्यक्तीकडून सतत करून न घेता आळीपाळीने करून घ्यावे.
- फवारणी दरम्यान नोझल गच्च झाल्यास किंवा कचरा अडकल्यास तोंडाने साफ न करता तारेच्या सहाय्याने साफ करावे.
- फवारणी करताना पंपाच्या विशिष्ट दाबानुसार फवारणीचे तुषाररूपी द्रावण बाहेर पडतात त्यामुळे फवारणाऱ्याने चालण्याचा वेग नियंत्रित करून झाडे नेमकिच सर्व बाजुंनी ओलीचिंब होऊन द्रावण थेंबरूपाने खाली पडणार नाही, याची काळजी घ्यावी.
- फवारणीचे काम पूर्ण झाल्यावर अंगावरील कपडे स्वच्छ धुवावे त्यानंतर सर्व अंग साबण लावून स्वच्छ पाण्याने धुवावे व अंग कोरडया स्वच्छ टॉवेलने पुसून दुसरे कपडे घालावे.
- फवारणी पश्चात खाणे-पिणे ईत्यादी सुरु करण्यापूर्वी हात व तोंड स्वच्छ धुवावे.
- कीटकनाशकाचे रिकामे डबे शेतात फेकून न देता पाण्याचे स्त्रोत विहीर, नदीपासून दूर किमान तीन वेळा स्वच्छ करुन जमिनीत खोल गाडून टाकावे.
- कीटकनाशकाचे रिकामे झालेल्या डब्याचा वापर अन्न किंवा पाणी साठवण्यासाठी चुकुनही करु नये.
- कीटकनाशकाचा वापर संपल्यावर उरलेली कीटकनाशके कडी कुलुपात बंद ठेवावी.

**विषबाधीत व्यक्तीची काळजी :**

- विषबाधा झाल्यास वेळ न घालवता बाधीत व्यक्तीस अपघात स्थळापासून सावलीच्या ठिकाणी न्यावे व ताबडतोब प्रथमोपचार करावा.
- विषबाधीत व्यक्तीचे बाधीत अवयव ताबडतोब साबण लावून स्वच्छ पाण्याने धुवावे व कोरडया स्वच्छ टॉवेलने पुसावे. विषबाधीत व्यक्तीला जास्त घाम येत असल्यास कोरडया टॉवेलने पुसावे.
- कीडनाशक पोटात गेलेले असल्यास विषबाधीत व्यक्तीला ताबडतोब ओकारी करण्याची उपाययोजना करावी.
- विषबाधीत व्यक्तीला पिण्यासाठी दूध तसेच विडी/ सिगारेट व तंबाखू देऊ नये व थंडी वाजत असल्यास अंगावर पांघरून द्यावे.
- विषबाधीत व्यक्तीला झटके येत असल्यास त्याच्या दातामध्ये मऊ कापडाची छोटी गुंडाळी टाकावी.
- विषबाधीत व्यक्ती त्वरित कीटकनाशकांच्या माहिती पत्रकासह डॉक्टरांकडे दाखवावे किंवा दवाखान्यात दाखल करावे व डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार करावे.
- विषबाधीत व्यक्ती बरी झाल्यावर त्याची संपूर्ण वैद्यकीय तपासणी करून घ्यावी.

**इतर काही महत्वाच्या सुचना :**

- विविध कीटकनाशके एकमेकात मिसळुन फवारणी करण्यापूर्वी नेहमी त्यांच्या सुसंगतते बाबतची माहिती संलग्न माहिती पत्रकातुन तपासून घ्या.
- आपल्या मनाप्रमाणे कीटकनाशके एकत्र मिसळणे टाळा.
- चुकून काही विषबाधा किंवा अपाय झाल्यास डॉक्टराना कीटकनाशकांचे मिश्रण केलेला तपशील दाखवा म्हणजे त्यामुळे डॉक्टरांना मिश्रणाबाबत योग्य उपचार करणे किंवा ते समजणे सोपे होईल.

क्रमशः जुलै २०२३ :

# सुधारीत बाजरी लागवड तंत्रज्ञान

४. मोसमी पाऊस सुरू होण्यापूर्वी शेताची व बांधाची स्वच्छता करून नंतर कीटक नाशकाचा मिथीलपॅराथिऑन २ टक्के भूकटी ( २० कि.ग्रॅं. / हेक्टरी) धुरळणी करावी.

५. कणसावरील भुंग्याच्या नियंत्रणासाठी वरीलप्रमाणे भुकटीचा उपयोग करावा.

**३) बनपंखी टोळ :**

टोळ लहान व मोठे बिनपंखी असतात. डोळे निमूळते व टोकदार असतात, शरीर लांबट असून हिरवट व गवती रंगाचे असते व डोळ्याभोवती पिवळे पट्टे असतात. टोळ पाणे कुरतडून खातात. यांचा जास्त प्रमाणात प्रादुर्भाव झाल्यास कीडग्रस्त शेतजमीन नांगरून टाकावी, बांध उन्हाळयात स्वच्छ करून खरडून ठेवावेत त्यामुळेअंडे उघडी पडतात व त्यास पाखरे वेचून खातात, बांधावर तसेच पड़ीत जमिनीवर मिथील पराँथीऑन २ टक्केभुकटी अथवा ( २० कि/ हेक्टरी) धूरळणी करावी.

बाजरी है अधिक उर्जा व खनिज मानवी शरीरास पुरवते त्यामध्ये Biofortified (जैव संपर्क्त) नविन संकरीत बाजरीचे दोन वाण वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प, औरंगाबाद व ICRIST यांच्या सहाय्याने विकसीत करण्यात आले.

**खत व्यवस्थापन**

| पद्धत | खते | १ महिन्यानी (किलो प्रति एकरी) |
|---|---|---|
| पध्दत-१ | युरिया ३० किलो + ए.एस.पी ७५ किलो + एम. ओ. पी. २० किलो | ३० किलो युरिया |
| पध्दत-२ | १५:१५:१५ - ८० किलो | ३० किलो युरिया |
| पध्दत-३ | १९:१९:१९ - ६५ किलो | ३० किलो युरिया |
| पध्दत-४ | १०:२६:२६ - ५० किलो + २० किलो युरिया | ३० किलो युरिया |
| पध्दत-५ | १८:४६:०० - २५ किलो + १५ किलो युरिया + २० किलो एम. ओ. पी. | ३० किलो युरिया |
| पध्दत-६ | २०:२०:०० - ६० किलो + २० किलो एम. ओ. पी. | ३० किलो युरिया |



ए.एच.बी.- १२००



ए.एच.बी. - १२६९